# गोंडवाना विद्यापीठ,गडचिरोली.

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशी–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
चा कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६(सत्र २०१७ चा
महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## ( विद्या विभाग )

एम. आय. डी. सी. रोड कॉम्प्लेक्स गडचिरोली –४४२६०५ (विद्या) फोन नंबर ७१३२. २२३३२३

जा.क्र/गोविग/विद्या/ 08 /२०२० दि.14/०१/२०२०

प्रति,

मा. प्राचार्य
संलग्नित महाविद्यालय,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय :– दिनांक २५/०१/२०२० रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्याबाबत.**

**संदर्भ :– जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी गडचिरोली क्र./कार्या–१०/ अका–१/निवड/कावि–३९/२०२०, दि. ०९/०१/२०२०.**

मा. महोदय,

उपरोक्त संदर्भाकीत विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी गडचिरोली यांच्या पत्रानुसार संपुर्ण देशभरात २५ जानेवारी २०२० रोजी १०व्या राष्ट्रीय मतदार दिवस, राज्य, जिल्हा, तालुका व मतदान केंद्र स्तरावर साजरा करावयाचा आहे. १०व्या राष्ट्रीय मतदार दिवसासाठी "Electoral Literacy for Stronger Democracy" हा विषय (Theme) आयोगाकडून देण्यात आला आहे. यापूर्वी ज्याधर्तीवर मतदार दिवस साजरा करण्यात येत होता त्याच धर्तीवर राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करण्यात यावा. असे संदर्भीय पत्रान्वये कळविलेले आहे.

विद्यापीठाच्या अधिनस्त असलेले सर्व महाविद्यालयात दि. २५ जानेवारी २०२० रोजी १०व्या राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करुन राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाचा अहवाल विद्या विभागाच्या ईमेल academic.gug@gmail.com वर दि. ३०/०१/२०२० पर्यत पाठवावे हि विंनती.

**सहपत्र :– जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी गडचिरोली यांचे पत्र.**

(दिपक जुनघरे)
उपकुलसचिव (विद्या)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**प्रतिलिपी** :– मा. विभाग प्रमुख पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव.

## निवडणुक साक्षरता क्लब (Electoral Literacy Club) :-

* निवडणूक साक्षरता क्लब ची स्थापना ८ व्या राष्ट्रीय मतदार दिनाच्या दिवशी केली असून त्यांची राष्ट्रीय मतदार दिवसाच्या आयोजनात महत्वाची भुमिका आहे.
* निवडणूक साक्षरता (क्लब नवीन मतदार) यांनी कॉलेज मधील विद्यार्थ्यांसाठी युवक मतदार उत्सव आयोजीत करुन नवीन मतदारांच्या जागृतीसाठी संसाधन पुस्तकातील उपक्रम शाळामध्ये साजरा करावा.
* मतदार संघ क्षेत्रातील चुनाव पाठशाळेत (समुदाय) यांनी संसाधन पुस्तिकेतील उपक्रम राष्ट्रीय मतदार दिवशी घेऊन मतदारामध्ये निवडणूक विषयी जागृती निर्माण करावी.
* शासनाच्या प्रत्येक विभाग/खाजगी संस्था/संघटना यांनी त्यामधील मतदार जागरुकता मंच सक्रीय करावेत. मतदार जागरुकता मंचाच्या सर्व सदस्यांनी एकत्र येऊन, शपथ घेऊन राष्ट्रीय मतदार दिवस साजरा करावा.